**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन आदेश क्रमांकः संकीर्ण २०२६/प्र.क्र. २२/प्रशा-३ (१४ अ)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: १३ एप्रिल, २०२६.

वाचा:- या विभागाचे समक्रमांकाचे आदेश दि. ०६.०३.२०२६

**शासन आदेश**

नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्याबाबतचा निर्णय दि. ०६.०५.२०२५ रोजी झालेल्या मा. मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने कुंभमेळा प्राधिकरणाचे कामकाज हाताळण्यासाठी नगर विकास विभागाच्या दि. १०.१०.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विविध संवर्गासाठी एकूण ७६ पदांना मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये मंत्रालयीन स्तरावर सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी स्वतंत्र कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. यास्तव सिंहस्थ कुंभमेळ्याच्या आयोजनाचा तसेच अंमलबजावणीचा कालावधी संपेपर्यंत नगर विकास विभागास बदलीने आवश्यक कर्मचारी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) व ४ (५) नुसार या विभागाच्या दि. ०६.०३.२०२६ रोजीच्या आदेशान्वये सहायक कक्ष अधिकारी व लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांची नगर विकास विभागात आंतरविभागीय बदली करण्यात आलेली आहे.

२. **या विभागाच्या दि. ०६.०३.२०२६ रोजीच्या आदेशातील श्री. संतोष विठ्ठल नाईकनवरे, सहायक कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग यांची नगर विकास विभागात करण्यात आलेली बदली प्रशासकीय कारणास्तव या आदेशान्वये रद्द करण्यात येत असून** त्याऐवजी खालील सहायक कक्ष अधिकारी यांची बदली महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) व ४ (५) नुसार सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कामकाजासाठी **नगर विकास विभागात** करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | श्री/ श्रीमती | कर्मचाऱ्यांचे नांव | पदनाम | सध्याचा विभाग |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १. | श्री. | नितीन बंकटराव पोपळे | सहायक कक्ष अधिकारी | सामान्य प्रशासन विभाग |

२. हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र.४८/१८ (र व का), दि. २५.०८.२०२२ मध्ये नमूद केल्यानुसार, संबंधित सहायक कक्ष अधिकाऱ्यांनी कार्यमुक्त होताना कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे.

४. नगर विकास विभागाने श्री. पोपळे हे विभागात रुजू झाल्याबाबतची माहिती सामान्य प्रशासन विभाग [कार्यासन/प्रशा-३ (१४-अ)] यांना त्वरीत सादर करावी.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४१३१३०९२०६९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

AKSHATA KAMOSH DESAI

Digitally signed by AKSHATA KAMOSH DESAI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=59a95eb36d13ce00c8c8d9fda89857cd27a7e7709afd65d3a808b2e470f6e2d5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1E6B65A66BF0CB664DFEDA36F9154BCDD9D89AAA98B88B5A2EA5CD4774355699, cn=AKSHATA KAMOSH DESAI
Date: 2026.04.13 13:10:27 +05'30'

**( अक्षता देसाई )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

श्री. नितीन बंकटराव पोपळे, सहायक कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग
श्री. संतोष विठ्ठल नाईकनवरे, सहायक कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग
(संबंधित विभागामार्फत)

**प्रत,**

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
२) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (आस्थापना), सामान्य प्रशासन विभाग/नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सह/उप सचिव (आस्थापना), सामान्य प्रशासन विभाग/नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, ठाकरसी हाऊस, बॅलार्ड पिअर, सुरजी वल्लभदास रोड, मुंबई-४००००१.
५) आहरण व संवितरण अधिकारी, संबंधित मंत्रालयीन विभाग
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७) निवड नस्ती- साप्रवि प्रशा-३ (१४ अ)